# योगिता खेडकरला राष्ट्रीय वेटलिफ्टिंग स्पर्धेत रौप्यपदक



**पाथर्डी शहर (युवा ध्येय)**
**राजेंद्र चव्हाण**

नुकत्याच पतियाळा (पंजाब) या ठिकाणी झालेल्या राष्ट्रीय ज्युनियर वेटलिफ्टिंग अजिंक्यपद स्पर्धेत ८१ किलो वजनगटात योगिता खेडकर या विद्यार्थिनीने डपरींलह प्रकारात ७६ किलो व क्लीन जर्क प्रकारात ९४ किलो असे एकूण १६९ किलो वजन उचलून रौप्यपदक पटकावले.

मागील वर्षी बुद्धगया येथे झालेल्या राष्ट्रीय युथ वेटलिफ्टिंग स्पर्धेत रौप्यपदक मिळविले होते. योगिता खेडकर ही बाबुजी आव्हाड महाविद्यालयाची विद्यार्थिनी असून महाविद्यालयाच्या वेटलिफ्टिंग सेंटरमध्ये सराव करते. अहमदनगर जिल्हा वेटलिफ्टिंग संघटनेचे सचिव व महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण संचालक प्रा. विजय देशमुख व क्रीडाशिक्षक प्रा. सचिन शिरसाट यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल तिचे पार्थ विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अभय आव्हाड, उपाध्यक्ष सुरेशराव आव्हाड, प्राचार्य डॉ. जी. पी. ढाकणे, अहमदनगर जिल्हा वेटलिफ्टिंग संघटनेचे अध्यक्ष प्रा. सुभाष देशमुख, उपाध्यक्ष राजेंद्र सोनवणे यांनी अभिनंदन केले.